सं. फौजदारी खटला क्र. **१०१५/२०२२**
श्रीराम बिल्डींग विरूद्ध सुखलालजी झोलबाजी
**निशाणी २० खाली**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ फिर्यादी मनोज बाबुलाल चंदन याची उलटतपासणी शपथेवर सुरू — आरोपीतर्फे ॲड श्री. डी. डी. वर्मा यांचे मार्फत.**

मी प्रस्तुत खटल्याव्यतिरीक्त अकोट येथील न्यायालयात आणखी एक चलनक्षम पत्रकांच्या कायद्यांतर्गत खटला दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी श्रीराम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स या दुकानाचा मालक असल्याबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेला नाही. माझेकडे बिल्डींग मटेरियल सप्लायर्स या धंद्याचा परीवाना आहे व तो मी दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणी आरोपीसोबत झालेला कथित व्यवहार कोणत्या तारखेचा आहे हे मी माझे फिर्यादमध्ये नमुद केलेले नाही. कथित विट विक्रीचा व्यवहाराचा प्रती नग बाबत तपशिल मी माझे फिर्यादमध्ये नमुद केलेला नाही. फिर्याद मध्ये नमुद कथित व्यवहारापोटी रक्कम रू. २,००,०००/— मी आरोपीला कधी दिले हे माझे फिर्यादमध्ये नमुद नाही.

२. हे म्हणणे खरे आहे की, बिल्डींग मटेरियल सप्लायर्स या व्यवसायात विटा, रेती, सिमेंट व गिट्टी हा माल विक्रीसाठी ठेवण्यातयेतो. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, सिमेंट हा माल विक्रीसाठी ठेवण्यात येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर व्यवसायासाठी रेती व गिट्टी विकत घेतांना शासनाचा परवाना घ्यावा लागतो व त्याबाबत अभिलेख सांभाळावा लागतो. माझेकडे वस्तु व सेवा कर परवाना आहे. माझेकडे सदर परवाना सन २०१८ पासुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला माझे दुकानाचा माल वस्तु व सेवा कर लाउन विकावा लागतो व त्याबाबत ग्राहकाला वस्तु व सेवा कर नमुद असलेल्या बिलाची पावती द्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, मला माझे दुकानाचा आवक व जावक खर्चाच्या नोंदी ठेवाव्या लागतात. हे म्हणणे खरे आहे की, रोज मेळ नोंद वहित अशा नोंदी करण्यात येतात. श्रीराम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स हे दुकान मी सन २०१८ मध्ये सुरू केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ पासुन आजपावेतो प्रत्येक वर्षी मी रोजमेळ नोंद वहित आवक—जावक खर्चाच्या नोंदी घेतलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोजमेळ नोंदवहिचे प्रत्येक वर्षाअखेर ताळेबंद बनवला जातो व असे ताळेबंद मी आजपावेतो बनवलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर ताळेबंदाच्या आधारे मला आयकर विवरण पत्र भरावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२२ सालचे आयकर विवरण पत्र मी भरलेले आहे.

**(आजरोजी उलटतपासादरम्यान फिर्यादीतर्फे निशाणी ३१ सोबत काही दस्त दाखल करण्यात आले. सदर दस्त वाचण्यासाठी वेळ मिळावा अशी आरोपीतर्फे तोंडी विनंती करण्यात आल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपावेतो तहकुब.)**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०१.१०.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.